# मेट्रो ३ : मिठी नदीखालील भुयारीकरण पूर्ण



**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेदरम्यानचा महत्त्वाचा टप्पा असणाऱ्या मिठी नदीखालील भुयारी मार्गाचे काम बुधवारी पूर्ण करण्यात आले आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या माध्यमातून जवळपास १.५ किमी लांबीचे भुयार पूर्ण करण्यात आले असून टेराटेक निर्मित गोदावरी ४ या टीबीएमने हे अंतर पूर्ण केले आहे.

बीकेसी येथील लॉंचिंग शाफ्टमधून २१ ऑगस्ट २०१९ रोजी गोदावरी ४ या टनेल बोरिंग मशीनच्या माध्यमातून काम सुरू करण्यात आले आणि धारावीपर्यंत १,०४३ आरसीसी रिंग्ससह भुयार खणण्यात आले. कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ मार्गाचा २९ वा भुयारीकरणाचा टप्पा आहे. मिठी नदी खालील भुयारीकरण मेट्रो ३ प्रकल्पातील सर्वात आव्हानात्मक काम होते. मुंबईतील गुंतागुंतीची भौगोलिक रचना, भूगर्भातील पाण्याची उच्च पातळी, शिवाय कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे येणाऱ्या मर्यादा यामुळे हे काम अधिक कठीण होते, मात्र एमएमआरसीसह कामगारांच्या टीमने हे शिवधनुष्य यशस्वीपणे पार पाडले याचा आनंद व्यवस्थापकीय संचालक रणजितसिंह देओल यांनी व्यक्त केला. या वर्षी मार्च महिन्यात गोदावरी ३ ने बीकेसी ते धारावीपर्यंत १.५ किमी डाऊन मार्गाचे भुयारीकरण पूर्ण केले होते. बीकेसी ते धारावीपर्यंतच्या एकूण ३ किमीपैकी ४८४ मीटर भुयार मिठी नदीच्या पात्राखाली आहे. धारावी, बीकेसी, विद्यानगरी व सांताक्रुझ स्थानकांचा समावेश असलेल्या पॅकेज ५ ने संपूर्ण ८ किमी लांबीचे भुयार पूर्ण केले आहे. प्रकल्पाचे आतापर्यंत १७ टीबीएमच्या मदतीने जवळपास ८५ टक्के भुयारीकरण आणि एकूण ५९ टक्के बांधकाम पूर्ण केले आहे.